Inward No. 48
29/11/99

श्रमसाफल्य एज्युकेशन सोसायटी, अंमळनेर जिल्हा जळगांव या संस्थेस एमएसडब्ल्यु/ बीएसडब्ल्यु समाजकार्य महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,

**शासन निर्णय क्रमांक**:सीएसडब्ल्यु-१०९६/१८९६/प्र.क्र.५२२/सुधार-१,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

**दिनांक : 24 नोव्हेंबर,१९९९**

**संदर्भ :-**

१) संचालक महिला बाल व अपंग विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश क्रमांक:मबाअविस/सकाम/मान्यता/९३-९४/का.५ब/ १९९३, दिनांक २९/०३/१९९४

२) संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक:शिक्षण/सकाम/मान्यता/याचिका क्र.५६७२/९७-९८/प्र.क्र.७ /का.५/५४५, दिनांक ०५/०७/१९९७

३) उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ, जळगांव यांचे पत्र क्रमांक: उमवि/५/४०३४/९८, दिनांक १९/०५/१९९८

४) समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.सीएसडब्ल्यु-१०९८/प्र.क्र.२८६/सुधार-१, दिनांक ०२/०२/१९९९

५) महाअभियोक्ता, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे दि.१५/१०/१९९९ चे पत्र

६) सहाय्यक सरकारी अभियोक्ता,उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचे दिनांक १५/११/१९९९ चे पत्र.

**शासन निर्णय :-** मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे श्रमसाफल्य एज्युकेशन सोसायटी, अंमळनेर, जिल्हा जळगांव यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशन क्रमांक:१४५९/९९ बाबत झालेल्या दिनांक १४ ऑक्टोबर,१९९९ च्या सुनावणीच्या वेळी मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांनी १९९४ सालातील परिस्थितीच्या अनुषंगाने या प्रकरणी शासनाने विचार करुन १ महिण्याच्या आत निर्णय घ्यावा असे आदेश दिलेले आहेत. त्या आदेशाच्या अनुषंगाने श्रमसाफल्य एज्युकेशन सोसायटी, अंमळनेर जिल्हा जळगांव या संस्थेतर्फे चालविण्यात येणा-या समाजकार्य महाविद्यालयास विना अनुदान तत्वावर मान्यता देऊन या संस्थेमार्फत एमएसडब्ल्यु/बीएसडब्ल्यु अभ्यासक्रमास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. सदर संस्थेला समाजकार्य महाविद्यालय सुरु करण्यास उत्तर महाराष्ट्र

विद्यापीठ, जळगांव व संचालक, समाजकल्याण, पुणे यांनी संदर्भाधीन पत्रान्वये विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम ८२(४) अन्वये शासनाकडे शिफारस केलेली होती. तसेच महाअभियोक्ता यांच्या उपरोक्त संदर्भाधिन दिनांक १५/१०/९९ च्या पत्रान्वयेही या प्रकरणी अभिप्राय प्राप्त झाले आहेत. या सर्व बाबींचा विचार करुन श्रमसाफल्य एज्युकेशन सोसायटी, अंमळनेर, जिल्हा जळगांव या संस्थेला सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्वावर समाजकार्य महाविद्यालय, एमएसडब्ल्यु/बीएसडब्ल्यु अभ्यासक्रम सुरु करण्यास खालील अटीं/ शर्तींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) संस्थेने शासन , विद्यापीठ, व विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या नियमांचे व मार्गदर्शक तत्वांचे काटेकोर पालन करावे.

२) संस्थेने एम.एस.डब्ल्यु./बी.एस.डब्ल्यु. अभ्यासक्रमास विद्यापीठाची संलग्नता प्राप्त करावी.

३) अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र ग्रंथालय सुरु करावे.

४) राज्यातील समाजकार्य महाविद्यालयाबाबत शासन वेळोवेळी जे धोरण निश्चित करील ते संस्थेला बंधनकारक राहील.

प्रस्तुत शासन निर्णय हा उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांनी दिलेल्या आदेशास ~~अनुकूल असून त्या अनुषंगाने~~ १९९४ मधील परिस्थिती विचारात घेऊन घेण्यात आल्यामुळे या अपवादात्मक परिस्थितीत घेतलेला निर्णय इतर कोणत्याही नित्याच्या वा न्यायालयीन प्रकरणी पायंडा म्हणून (Precedent) लागु राहणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( उ. ना. शिंगाडे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :-

१) चेअरमन, श्रमसाफल्य ऐज्युकेशन सोसायटी, अंमळनेर, जिल्हा जळगांव-४२५ ४०१.

२) कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ , जळगाव

३) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

४) विभागीय समाजकल्याण अधिकारी, नाशिक/औरंगाबाद.

५) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जळगांव.

६) निवड नस्ती - सुधार-१.